# Pradnya Probodhini Career Academy, Nagpur

## Current Affairs and Issues

## चर्चेतील मुद्दा -Lateral Entry Scheme- Part 1

By Sraman Sir, Sr.Faculty

**प्रश्न १. थेट अधिकारी भरती योजना काय आहे ?**

उत्तर - प्रशासनात खासगी क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींना सामील करून त्यांचा ज्ञानाचा उपयोग करावा,आणि अधिकाऱ्यांची कमतरता दूर करावी या उद्देशाने २०१८ पासून हि योजना सुरु करण्यात आली.

**प्रश्न२. सध्या हि योजना चर्चेत का ?**

उत्तर - या योजनेंतर्गत युपीएससी ने ४५ विविध पदांची भरतीची जाहिरात १७ ऑगस्त २०२४ ला दिली. त्यावर आक्षेप सत्ताधारी पक्षाचे सहकारी ,विरोधी पक्ष यांनी घेतला .परिणामी केवळ ३ दिवसातच सरकारने युपीएससीला जाहिरात रद्द करण्यास सांगितले.

**प्रश्न३. कोणत्या स्वरुपाची पदे यात होती ?**

उत्तर - विविध मंत्रालयांतर्गत येणारी -Joint Secretary/Director/Deputy Secretary.

**प्रश्न४. थेट भरती कशी होणार होती ?**

उत्तर - ऑनलाईन आवेदन भरणे =>मुलाखत =>नियुक्ती

**प्रश्न ५ . नियुक्तीचे स्वरूप कसे होते?**

उत्तर- तीन वर्षासाठी हि नियुक्ती असून त्यात कामगिरीनुसार ५ वर्षापर्यंत मुदत देता येवू शकते.

## प्रश्न ६. आतापर्यंत या योजनेमार्फत किती खासगी व्यक्तीची थेट भरती करण्यात आली आहे ?

उत्तर- २०१८ पासून चार वेळा हि भरती केली गेली असून त्यात एकूण ५७ खासगी व्यक्तीची थेट भरती करण्यात आली आहे.

**प्रश्न ७. या योजनेवर आक्षेप काय?**

उत्तर - आक्षेप

१.हि योजना संविधानातील सामाजिक उद्‌दिष्टांचा उल्लंघन करते.यात भरती प्रक्रियेत कुठेही आरक्षण नाही.

२. तज्ञ व्यक्तीचा ज्ञानाचा उपयोग व्हावा हे उदिष्ट असले तर त्याला प्रशासकीय अधिकाराचे पद दिले पाहिजे.या पद भरतीत केवळ कारकुनी स्वरूपाचे पद असून त्यावरील कोणत्याही तज्ञ व्यक्तीचा ज्ञानाचा उपयोग कसा होईल?

३. आधी भरती झालेल्या ५७ अधिकाऱ्यापैकी त्यातले मागास किती, अल्पसंख्याक किती व त्यांच्या ज्ञानाचा नेमका कोणता फायदा देशाला झाला याची माहिती जाहीर

करण्याच्या भानगडीत सरकार कधी पडले नाही.त्यामुळे विशिष्ट विचारसरणीच्या व्यक्तींचा भरणा होणार हे संशय बळावलेल आहे.

४. भारतीय नागरी प्रशाकीय व्यवस्था हि आतापर्यंत नियामाकता आणि प्रक्रियेवर अधिक भर देणारी ठरलेली आहे. हे समकालीन व्यवस्थापन तत्त्वज्ञानाशी विसंगत आहे तसेच ते नवकल्पना राबवण्यातला प्रमुख अडथळा ठरते.त्यामुळे ही समस्या नागरी सेवा व्यवस्थेची- व्यवस्थात्मक- आहे, वैयक्तिक अधिकारी ही यंत्रणा तयार करत नाहीत. म्हणून तज्ञ व्यक्तीचा समवेश करून हाती काही प्राप्त होईल का या बाबत सांशकता आहे

५. खासगी क्षेत्रात तज्ज्ञ म्हणून नाव कमावणाऱ्या मान्यवरांचा सरकारात समावेश करून घ्यायला काहीच हरकत नाही. काँग्रेस तसेच यूपीएच्या कार्यकाळात डॉ. मनमोहन सिंग वित्त सचिव झाले ते याच पद्धतीने. 'आधार योजने'ला आकार दिला तो नंदन निलेकणींनी. इतकेच काय तर वाजपेयींच्या कार्यकाळात विजय केळकरांना सेवेची संधी मिळाली ती यामुळेच. पण हे लक्षात घेतले पाहिजे की या दोन्ही व्यक्तींना कॅबिनेट मंत्रिपद देण्यात आले होते, ज्यामुळे ते अधिकार वापरण्यास आणि परिणाम साध्य करण्यास सक्षम झाले. कॉर्पोरेट क्षेत्रातून खालच्या स्तरावर (संयुक्त सचिव किंवा संचालक) 'लॅटरल एण्ट्री'ची थेट भरती करणे यातून अजिबात नीलेकण सारखे परिणाम मिळणार नाहीत. कारण प्रणाली अशी नाही की हे अधिकारी त्यांचे कौशल्य आणि प्रतिभा पूर्णपणे प्रदर्शित करू शकतील, ही समस्या उच्च शैक्षणिक प्रमाणपत्रे असलेल्या अनेक सनदी अधिकाऱ्यांनाही आज आहे.

६. या आधी देखील राज्ये आणि विरोधी पक्षांनी या योजनेवर आक्षेप घेतले होते मात्र सरकारने बहुमताच्या जोरावर वेळ मारून नेली . हे करताना मात्र सरकारी

धोरणांची अंमलबजावणी करताना सर्वसमावेशकता व सल्लामसलतीचा गुण अंगीकारणे या गोष्टीचा विसर तिला पडला असावा.

**प्रश्न ८. या योजनेचा संक्षिप्त इतिहास काय ?**

उत्तर - इतिहास

१. १९४९ आणि १९५६ साली थेट भरती करण्यात आली होती ,त्यावेळेची आकस्मिक गरज म्हणून.
२. २०११-सहाव्या पे कमिशन च्या शिफारशीवर मनमोहन सिंघ सरकारने १० % थेट खासगी तज्ञांनाचा जागा प्रस्ताव ठेवला होता
३. २०१७ - नीती आयोगाच्या शिफारशी
४. २०१८ - पासून अंमलबजावणी